ज .ए .इ ची पूर्व प्राथमिक शाळा (सुभेदारवाडा) कल्याण (प )

## वार्षिक अहवाल सन २०२०-२०२१

सस्नेह नमस्कार !

जनरल एज्युकेशन इन्स्टिटूटची पूर्व प्राथमिक शाळा ,सुभेदारवाडा ,गांधी चौक ,कल्याण (प ) आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे .

नोव्हेंबर १९८४ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिटूटची पूर्व प्राथमिक शाळा, कल्याण मधील सुभेदारवाड्यात सुरु झाली .सध्या शाळेच्या पूर्व प्राथामिक विभागात नर्सरी चा १ वर्ग , छोटा शिशुवर्गाचे २ वर्ग ,मोठा शिशु वर्गाचे ४ वर्ग असून एकूण ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत .शाळेत १ मुख्याध्यापिका,५ सहाय्यक शिक्षिका ,१ संगीत शिक्षिका, १ लिपिक व ५ सेविका इ. कार्यरत आहेत .त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते .

कोरोना विषाणूच्या महामारीमुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ ची सुरुवात दि. १५ जून २०२० पासून होऊ शकली नाही .ही बाब लक्षात घेऊन सुभेदारवाडा संकुलाने Microsoft Teams या अँपद्वारे विद्यार्थ्यांना ‘शिक्षण मिळावे’ या उद्दात हेतूने ऑनलाईन शिक्षणास प्रारंभ केला. त्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देखील दिले गेले.

ऑनलाईन शिक्षण सुरु करण्यापूर्वी शाळेने विद्यार्थ्यांचे व्हाट्सअँप ग्रुप तयार केले . जुलै २०२० पासून वेगवेगळ्या विषयांचे शैक्षणिक व्हिडीओ पाठवले .त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडला नाही .

विद्यार्थ्यांचे पासवर्ड व आयडी आल्यानंतर त्यांच्याशी व्हाट्सअँप ग्रुपवर मेसेज पाठवून त्यांना टीम अँपवर ऍड करून घेण्यात आले.

Ŏ रविवार दिनांक ०९ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ११ वाजता छोटा शिशु वर्गाच्या पालकांची सभा घेण्यात आली.

Ŏ रविवार दि १६ ऑगस्ट २०२० रोजी सकाळी ११ वाजता मोठा शिशु वर्गाच्या पालकांची सभा घेण्यात आली.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ . निलीमा ताईंनी पालकांशी संवाद साधला .सर्व शिक्षकांची ओळख करून देण्यात आली .जेष्ठ शिक्षिका सौ.विद्या ताई

यांनी Microsoft Teams अँप विषयी माहिती सांगितली व पालकांचे आभार मानले .ऑनलाईन तासाची वेळ ९. ३० ते १०. ०० ठरविण्यात आली .

ऑनलाईन तासांचे नर्सरी ,छोटा शिशु व मोठा शिशु वर्गांचे वेळापत्रक तयार करण्यात आले . नर्सरी चे आठवड्यातून ३ दिवस ऑनलाईन तास घेण्यात आले व ३ दिवस शैक्षणिक व्हिडीओ पाठवण्यात आले .नर्सरीच्या तासाची वेळ सकाळी ९. ०० ते ९. ३० अशी होती .सोमवार दिनांक १० ऑगस्ट ते शुक्रवार दि १४ ऑगस्ट पर्यंत छोट्या शिशूचे ऑनलाईन तास घेण्यात आले व मोठ्या शिशु वर्गावर सकाळी ९. ३० ते १०. ०० या वेळेत ऑनलाईन तास घेण्यात येत होते .

 Š शनिवार दि १५ ऑगस्ट या दिवशी 'ध्वजारोहणाचा 'कार्यक्रम' शाळेच्या प्रांगणात सकाळी ७:१५ वाजता करण्यात आला .यावेळी मा .श्री .बोरकर सर सरदेसाई सर ,पाटील सर हे उपस्थित होते तसेच काही शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.बाकी सर्वा संकुलातील शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी हे ऑनलाईन उपस्थित होते .कार्यक्रमाची वेळ ७:१५ ते ८:३० होती .

Š कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे सन २०१९-२०२० या वर्षाचा निकाल १८ ऑगस्ट ते २४ ऑगस्ट या कालावधीत देण्यात आला .

Š शनिवार दि ०५/०९/२०२० रोजी सांपूर्ण विद्यासंकुलाचा 'शिक्षक दिन' ऑनलाईन पद्धतीने साजरा करण्यात आला .

Šशुक्रवार दि २५ सप्टेंबर रोजी ऑनलाईन तासाला प्राथमिक विभागाच्या सहा .शिक्षिका पष्टे यांनी तयार केलेला व्हिडीओ संकुलातील सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला .

Š दि २१/१०/२०२० व २२/१०/२०२० रोजी छोटा शिशु वर्गातील फक्त मुलींचा 'माझा आवडता पक्षी' या विषयावर उपक्रम घेण्यात आला व दि २२/१०/२०२० रोजी मोठा शिशु वर्गाचा 'माझा आवडता प्राणी' हा उपक्रम घेण्यात आला .उत्कृष्ट सादरीकरण करण्याऱ्या विद्यार्थ्यांना शाळेतर्फे पारितोषिके देण्यात आली . ऑनलाईन तासाला भोंडल्याची गाणी सादर करण्यात आली.

Š दसरा या सणानिमित्त ऑनलाईन तासाला पाटीपूजन घेण्यात आले .

Ŏ छोटा शिशु व मोठा शिशु वर्गाचे सराव पेपर व्हाट्सअँप ग्रुप वर पाठविण्यात आले .

Ŏ दिवाळी सणाची माहिती व व्हिडीओ मुलांना व्हाट्सअँप च्या माध्यमातून पाठविण्यात आले .

Ŏ शनिवार दि ०७/११/२०२० ते शनिवार दि २१/११/२०२० पर्यंत ऑनलाईन तासाला दिवाळीची सुट्टी देण्यात आली .

Ŏगुरुवार दि २४/१२/२०२० रोजी ऑनलाईन तासाला 'नाताळ' सणाची माहिती देण्यात आली

***शनिवार दिनांक९.०१.२०२१ व सोम.११.०१.२०२१ रोजी नर्सरी, छोटा शिशुव मोठा शिशु वर्गाची 'पालकसभा' सकाळी ९:३० ते १०:३० या वेळेत घेण्यात आली.**

***गुरुवार दि.१४.०१.२०२१ रोजी 'संक्रांत' या सणाची माहिती ऑनलाइन तासाला सांगण्यात आली.**

***मंगळवार दि.२६.०१.२०२१रोजी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शाळेच्या प्रांगणात झेंडावंदनाचा कार्यक्रम करण्यात आला.**

***दुसऱ्या सत्रात जानेवारी महिन्यात पालक सभेचे आयोजन करण्यात आले.**

***महिला दिनाचे औचित्य साधून नर्सरी, छोटा शिशु व मोठा शिशु वर्गातील फक्त मुलींसाठी ऑनलाइन तासाला 'वेशभूषा' उपक्रम घेण्यात आला. उत्कृष्ट सादरीकरण** करण्याऱ्या **विद्यार्थिनींना शाळेतर्फे पारितोषिक देण्यात आले.**

*** 'होळी' सणानिमित्त नर्सरी, छोटा शिशु व मोठा शिशु वर्गातील फक्त मुलांचा "सणांची माहिती सांगणे" हा उपक्रम घेण्यात आला. उत्कृष्ट सादरीकरण** करण्याऱ्या **विद्यार्थ्यांना शाळेतर्फे पारितोषिक देण्यात आले.**

*** जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट ची पूर्व प्राथमिक शाळा सुभेदारवाडा, कल्याण या विभागातील ज्येष्ठ सहा.शिक्षिका श्रीम. देवळे वैशाली विवेकानंद यांना संस्थेकडून श्री. विजय श्रीधर कामेरकर पुरस्कृत कै.सौ. सुरेखा श्रीधर कामेरकर "आदर्श शिक्षक पुरस्कार"(२०२०-२०२१) जाहीर करण्यात आला. शाळेतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन!**

*** मार्च महिन्यातनर्सरी, छोटा शिशु व मोठ्या शिशु वर्गातील विद्यार्थ्यांशी वर्गशिक्षिकेने व्हॉट्सॲप व्हिडिओद्वारे संवाद साधून विद्यार्थ्यांचे विषयानुरूप मूल्यमापन केले.**

* शनि.दि.२४.०४.२०२१ रोजी स.१०:००वा.जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट, दादर संस्थेचा १३० वा वर्धापन दिन ऑनलाईन आयोजित करण्यात आला.

अशा विशाल वटवृक्षाला समृद्धी आणि यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व आपले बालगोपाळ सतत प्रयत्नशील असतात. त्यांना सुयश मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

धन्यवाद!

श्रीम. नीलिमा नरेश भाभे

मुख्याध्यापिका

पूर्व प्राथमिक शाळा.

सुभेदारवाडा,कल्याण (प)